# अलक १-३

*****
*कोंडी :*
मी लेकीच्या बाळंतपणासाठी परदेशी चालले होते. तिथे सहा महिने रहाणार होते. इथून निघायला मोजून दहा दिवस होते आणि आईची तब्येत जरा बिघडली. म्हणावा असा मोठा आजार नव्हता. अशक्तपणा, जेवण जात नव्हतं. डॉक्टर म्हणाले, “नव्वदी आली. असं चालायचंच. रोजचा दिवस बोनस समजायचा आता.”
जिने जन्म दिला तिचा गळून पडण्याकडे सुरू झालेला प्रवास, तर तिकडे जिला जन्म दिला तिच्या गर्भात रुजलेला कोंब... जगात यायला आसुसलेला !
मन द्विधावस्थेत. आणि माझ्या मनाची *कोंडी...!!*
*****

*****
*कोंडी :*
भाचीच्या लग्नात कुणीतरी टोमणा मारला. दादाला आणि मला ते खरं वाटलं. भावा-बहिणीत अकारण गैरसमज झाला. दोघांचा इगो दुखावला.
रक्षाबंधन आणि भाऊबीजेचे सण आले- गेले. पण दोन घरं दुरावली ती दुरावलीच. माहेर तुटलं...
एकदा श्रावणात सहा वर्षाच्या माझ्या नातीला घेऊन देवळात गेले होते. तिथे दादा, वहिनी, भाची आणि भाचीचं छोटं बाळ सामोरी आले.
नात पटकन म्हणाली, “आत्या, तुझं बाळ? म्हणजे माझा भाऊ ना? रक्षाबंधनला याला घेऊन आमच्याकडे येशील? नक्की? मी वाट पाहीन.”
क्षणात सगळे मान-अपमान गळून पडले. नकळत मनाची *कोंडी* कधी सुटली कळलंच नाही !!
*****

*****
*विश्वास :*
पाच-सहा वर्षांची होते. दिवाळीमध्ये फटाके उडवत असताना फुलबाजीची ठिणगी डोळ्यात उडाली. एक डोळा निकामी आणि दुसरा अधू झाला तो कायमचाच.
वाचून दाखवलेला अभ्यास करायला, जगात वावरायला शिकले. आलेली सत्य परिस्थिती स्वीकारली. मिळालेला जन्म नाकारायचा मला अधिकार नाही हे ठसवलं.

तसा *विश्वास* मनाला दिला...
संकटांवर मात करत पुढे गेलं की संकटं 'छोटी' होतात. आपण 'मोठे' होतो ही जाणीव झाली.
आणि आपण कुणी आहोत हा *विश्वास* निर्माण झाला !!!
*****

***लीना माटे***